| | |
|---|---|
| दाखल तारीख | १७/०३/२०२५ |
| नोंदणी तारीख | १७/०३/२०२५ |
| निर्णय तारीख | १२/०३/२०२६ |
| कालावधी | ०० व., ११ म., दि.२३. |
| **CNR No.MHGA050002522025** | |

भाग – अ
(न्यायनिर्णयाची शीर्षक पान)
[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (१)]

| | |
|---|---|
| | **निशाणी क्र.०८ खाली...** |
| **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, देसाईगंज यांचे न्यायालयात.**<br>(पिठासीन अधिकारी – सतिश गो. गोरे) | |
| **अपराध क्रमांक व पोलीस स्टेशनचा तपशील** | **अपराध क्र.४६७/२०२४,**<br>पोलीस स्टेशन, देसाईगंज. |
| **न्यायनिर्णयाचा दिनांक** | १२/०३/२०२६ |
| **प्रकरण क्रमांक** | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक १७३/२०२५** |
| **अभियोग पक्ष :** | **महाराष्ट्र शासन** तर्फे<br>पोलीस स्टेशन अधिकारी, देसाईगंज,<br>ता. देसाईगंज, जि. गडचिरोली.<br>(शैलेश तोरपकवार, पो.शि. ब.नं.३७५५) |
| **अभियोग पक्षातर्फे** | **श्री. आर.डब्ल्यु.सकिनलावार,**<br>विशेष सहायक सरकारी अधिवक्ता |
| **आरोपी :** | **१. अविनाश घनश्याम घुटके,**<br>वय – २६ वर्ष, धंदा –मजुरी,<br>रा. कुरूड, ता. देसाईगंज, जि.गडचिरोली<br>**२. निखील प्रभुजी मलगाम,**<br>वय – २७ वर्ष, धंदा –मजुरी,<br>रा. फरीझरी, |

| | |
|---|---|
| | ता. देसाईगंज, जि.गडचिरोली<br>**३. मोहन बाजीराव पिलारे,**<br>वय – ३० वर्ष, धंदा –मजुरी,<br>रा. भगतसिंग वार्ड, देसाईगंज,<br>ता. देसाईगंज, जि. गडचिरोली. |
| **आरोपीतर्फे अधिवक्ता :** | **श्री. एम.आर.शेंडे.** |

**भाग – ब**
**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (२)]**

| | |
|---|---|
| घटनेचा दिनांक : | २१/१२/२०२४ |
| एफ.आय.आर. दिनांक : | २१/१२/२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक : | १७/०३/२०२५ |
| गुन्ह्याचा तपशील निश्चितीचा दिनांक : | २९/०५/२०२५ |
| पुराव्यास सुरुवात झाल्याचा दिनांक : | २९/०५/२०२५ |
| निकालाकरिता ठेवल्याचा दिनांक : | ०५/०३/२०२६ |
| निकाल दिनांक : | १२/०३/२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास तो दिनांक | ---- |

**आरोपीचा तपशील**

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिन तारीख | दोषारोप /आरोप | दोषी / निर्दोष | शिक्षा | तुरुंगामध्ये न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अविनाश घनश्याम घुटके | --- | १७/०३/२०२५ | ६५(अ), ८३ महाराष्ट्र दारुबंदी कायदा | निर्दोष | नाही | नाही |
| २ | निखील प्रभुजी मलगाम | | | | | | |
| ३ | मोहन बाजीराव | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पिलारे | | | | | | |

भाग – क
[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (३)]
अभियोग पक्ष/ बचाव पक्ष / न्यायालयाने बोलाविलेल्या साक्षदारांची यादी

| क्र. | नाव | साक्षदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | प्रणय गजानन आत्राम (**नि.क्र.०८ च्या पुढे**) | पंच साक्षदार |
| अ.सा.क्र.२ | अनुज गिरीधर मडावी (**नि.क्र.०८ च्या पुढे**) | पंच साक्षदार |

बचावपक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षदारांची यादी

| अ.क्र. | नाव | साक्षेचे स्वरुप |
|---|---|---|
| ब.सा.क्र. १ | निरंक | निरंक |

न्यायालयातर्फे नोंदविलेल्या साक्षदारांची यादी

| अ. क्र. | नाव | साक्षेचे स्वरुप |
|---|---|---|
| न्या.सा.क्र. १ | निरंक | निरंक |

सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

बचावपक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्राची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

बचावपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्राची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | नि.क्र.९ | रासायनिक परीक्षण अहवाल |

मेटरीअल ऑब्जेक्ट/महत्त्वाच्या वस्तू

| अ. क्र. | मटेरिअल ऑब्जेक्ट /महत्त्वाच्या वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## :: न्यायनिर्णय ::

(जाहिर दिनांक १२/०३/२०२६)

आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५ (अ) व ८३ अन्वये शिक्षेस पात्र अपराधाकरिता संपरिक्षा चालविण्यात आली. खटल्याच्या न्यायनिर्णयाकरिता पुढील मुद्दे उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष पुढील नमूद कारणांकरिता नोंदविण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, दि. २१/१२/२०२४ ला १२:२० ते १३:२० वाजताच्या सुमारास, मौजा कुरूड, ता. देसाईगंज, जिल्हा गडचिरोली येथे आरोपी क्र.१ त्याच्या घरामध्ये ३०० नग देशी दारू प्रत्येकी ९० मिली आरोपी क्र.२ व ३ ने दिलेला माल अवैधरित्या विनापरवाना विक्रीकरिता बाळगुन मिळून आला ? | **...नाही** |
| २. | आदेश काय ? | **...अंतीम आदेशानुसार** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ करीता** :-

२. आरोपींवर ठेवलेला दोषारोप सिद्ध करण्याकरिता अभियोग पक्षाने प्रणय गजानन आत्राम **(अ.सा.क्र.१)** व अनुज गिरीधर मडावी **(अ.सा.क्र.२)** यांना तपासले. अभियोग पक्षातर्फे पुरसीस **(नि.क्र.११)** दाखल करून सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

आरोपींविरूद्ध कोणताही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आला नसल्यामुळे त्यांचे भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ३५१(१)(ब) अन्वयेचे जवाब वगळण्यात आले. रासायनिक परिक्षणाचा अहवाल **(नि.क्र.९)** अभिलेखावर दाखल आहे.

३. प्रणय **(अ.सा.क्र.१)** व अनुज **(अ.सा.क्र.२)** हे घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षदार आहेत. त्यांच्या साक्षेत असे आले की, ते आरोपींना ओळखतो. पोलिसांनी त्यांना पंचनामा करण्यासाठी कोठेही बोलाविले नव्हते व त्यांच्या समक्ष कोणतीही कारवाई करण्यात आलेली नव्हती. त्यांनी घटनास्थळ कम जप्ती पंचनाम्यावर त्यांच्या सह्या असल्याचे सांगितले, परंतु त्यातील मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविली. सदर साक्षदारांनी उलटतपासात विचारल्या जाणारे उत्तर सुचक प्रश्न अभियोग पक्षाद्वारे विचारले असता सुध्दा त्यामध्येही त्यांनी पोलीसांनी त्यांच्या समक्ष आरोपी क्र.१ च्या घरामधुन ३०० नग देशी दारू जप्त केली होती व त्याबाबतचा घटनास्थळ कम जप्ती पंचनामा त्यांच्यासमक्ष तयार केला होता व त्यावर त्यांनी सह्या केल्या होत्या, असे अभियोग पक्षाचे सर्व कथन त्यांनी नाकारले.

४. अभियोग पक्षाद्वारे तपासण्यात आलेले पंच साक्षदार फितूर झालेले आहेत. अभियोग पक्षाने फिर्यादीची साक्ष न नोंदविल्यामुळे अभियोग पक्ष फिर्याद तसेच छापील प्रथम खबर अहवाल व त्यामधील मजकूर, घटनास्थळ कम जप्ती पंचनामा व त्यातील मजकूर सिद्ध करु शकला नाही. अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषणाचा अहवाल सादर

केलेला आहे, परंतु जप्त नमुने रासायनिक विश्लेषणाच्या कार्यालयात घेवून जाणारा कोणताही साक्षदार तपासलेला नाही. त्यामुळे नेमके कोणते जप्त नमुने रासायनिक विश्लेषणासाठी पाठविले होते, तसेच अभिलेखावर दाखल रासायनिक विश्लेषणाचा अहवाल हा नेमका कोणत्या प्रकरणातील जप्त नमुन्यांचा आहे, हे स्पष्ट होत नाही. वर चर्चिलेल्या बाबी लक्षात घेता आरोपी क्र.१ त्याच्या घरी देशी दारू अवैधरित्या विनापरवाना विक्रीकरिता बाळगुन मिळून आला होता, ही बाब स्विकारार्ह नाही तसेच अभियोग पक्ष ती बाब सिद्ध करु शकला नाही.

५. कलम ६५(अ) व ८३ महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये गुन्हा सिद्ध होण्यासाठी जप्त मुद्देमाल देशी दारू आरोपी क्र.१ विक्री करण्याच्या उद्देशाने आ.क्र.२ ने आणुन दिलेली विनापरवाना बाळगून होता, या बाबी सिद्ध होणे आवश्यक आहे. तसेच, आरोपीकडून द्रावण जप्त करुन ते प्रथम मुद्देमाल मोहररकडे पोलीस स्टेशनमध्ये जमा केले आणि त्यानंतर मुद्देमाल मोहररपासून त्यामध्ये कोणतीही अदलाबदल किंवा अफरातफर न करता ते रासायनिक विश्लेषणाकरीता पाठविले, याबाबत स्पष्ट असा साखळी पुरावा अभिलेखावर येणे आवश्यक असते.

६. वरील सर्व बाबींचा विचार केला असता असे दिसून येते की, अभियोग पक्ष आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(अ) व ८३ अंतर्गत गुन्हा सिद्ध करण्यास अपयशी ठरला आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. २ करीता :–**

७. मुद्दा क्र. १ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरुन आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र आहेत. जप्त मुद्देमाल दारूपैकी रासायनिक विश्लेषणाकरिता काढलेल्या मुद्देमालाव्यतिरिक्त इतर मुद्देमाल अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गडचिराली यांच्याकडे दि. २५.०८.२०२५ च्या नि.क्र.१० खालील आदेशानुसार आधीच त्याची विल्हेवाट लावण्याकरीता पाठविण्यात आलेला आहे, त्यामुळे त्याबाबत वेगळा आदेश करण्याची आवश्यकता नाही. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८१(१) ची पूर्तता आधीच केली आहे, म्हणून मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपींना भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(अ) व ८३ खालील गुन्ह्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे जात मुचलके व बंधपत्र रद्द करण्यात येते.

**(न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

Digitally signed by SATISH GOPALRAO GORE
Date: 2026.03.12 13:41:37 +0530

दिनांक :१२/०३/२०२६

**(सतिश गोपालराव गोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, देसाईगंज.
JO CODE- MH02902